# 'कमला', मगदूम हायस्कूलचे मैदानी स्पर्धेवर वर्चस्व

कोल्हापूर, ता. १५ : शहरस्तरीय शासकीय महिला मैदानी स्पर्धेत धावण्याच्या प्रकारात दादासाहेब मगदूम हायस्कूल, तर फेकी व उड्यांच्या प्रकारात कमला कॉलेजच्या खेळाडूंनी वर्चस्व राखले. शाहू महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर या स्पर्धा पार पडल्या.

गटवार निकाल असा : (प्रथम, दोन विजेत्या) : १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावणे : सीमा ठाकूर, (२) प्रमिला कोरे (दोघीही दादासाहेब मगदूम हायस्कूल). १५०० मीटर : गायत्री आडके, गौरी देवणे (दोघीही मगदूम हायस्कूल). ८०० मीटर : गौरी देवणे (मगदूम हायस्कूल), कविता जाधव (न्यू इंग्लिश मीडियम स्कूल).

रिले ४×१०० : न्यू इंग्लिश मीडियम स्कूल कमला कॉलेज. ४×४०० : कमला कॉलेज प्रबुद्ध भारत हायस्कूल.

गोळाफेक : शितल चौगले, मंजुषा आवटी (दोघीही कमला).

थाळीफेक : भारती पाटील (प्र. भारत हायस्कूल), मंजुषा आवटी (कमला).

भालाफेक : रुपा सुतार, स्वाती जाधव (दोघीही कमला).

लांबउडी : तेजस्विनी पवार (कमला कॉलेज), संगीता कोळी (मगदूम हायस्कूल).

उंचउडी : प्रफुल्ला सुर्वे, शिल्पा हुक्किरे (दोघीही कमला).

स्पर्धेचे संयोजन जिल्हा ॲथलेटिक संघटना व क्रीडा कार्यालयाचे बी. एस. पाटील यांनी केले.

कदम महाविद्यालयाला

14/10/99

# कमला कॉलेज प्राध्यापक विद्यार्थीनींची सैनिक निधीस मदत

*कोल्हापूर, दि. १३*

आपल्या उत्तर सिमेवर ऑपरेशन विजयमध्ये धारातिर्थी पडलेल्या जवानांच्या कुटुंबीयांसाठी कमला कॉलेजच्या प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थीनींच्या वतीने ३३,८८९ रुपयेचा निधी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांच्याहस्ते निवासी उपजिल्हाधिकारी अनिल कवडे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला.

यावेळी कॅप्टन एस. एस. माने (जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी) यांनी महाविद्यालयाच्या या कामगिरीबद्दल आभार मानून, देशासाठी कढणाऱ्या सैनिकांना देशवासियांची फक्त सहानुभुती आणि प्रेम हवे असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्रा. टी. पी. पाटील यांनी केले. कुमारी मनिषा गुरव या विद्यार्थीनीने आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

1-9-99

# चारित्र्यसंपन्न व्यक्तींची समाजाला गरज - इंगळे

*कोल्हापूर, दि. १५*

चारित्र्य संपन्न व्यक्तींची आज समाजास गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक सुधीर इंगळे यांनी केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये 'राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्व विकास' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. के. बी. पाटील होते.

श्री. इंगळे पुढे म्हणाले, सध्या आपल्या व्यक्तिमत्वावर चंगळवाद आणि भोगवादाचे आक्रमण होत असल्यामुळे व्यक्तिमत्व विकास खुंटत आहे. समाजातील वाढते अन्याय, अत्याचार थोपविण्याची जबाबदारी तरूण पिढीवर आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करून अंगी आत्मविश्वास, स्वावलंबन आणि शिस्त या गुणांची वाढ करण्याचे आवाहन त्यांनी केले.प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. ए. एस. घस्ते यांनी करून दिला. प्रा. ए. एम. सोळोखे यांनी आभार मानले.